

# अट्टलमत



RNI.No. MAHMAR/2007/21199

Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१८, अंक-३२ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. २८ एप्रिल ते ४ मे एप्रिल २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४

# काही महिन्यापूर्वी बंजारा समाजातील तरुणीचे अपहरण करणारा राक्षसीवृत्तीचा रविकांत राठोड समाजात मोकाट फिरतोच कसा ?

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

बंजारा समाज बांधवांच्या हितासाठी कार्य करणारी एकमेव संघटना असी टेंभी मिरवणारे बंजारा ब्रिगेडचे स्वयंघोषित राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत अंबादास राठोड यांच्या कुकृत्याचे वेगवेगळे किस्से



ऐकून सर्वसामान्य माणसांना चीड निर्माण होऊ लागली आहे. बंजारा ब्रिगेडमध्ये कार्य करणारे महिला पुरुष पदाधिकारी काही महिन्यापूर्वी छत्रपती संभाजीनगरातील एका तरुण महिलेच्या घरात जबरदस्तीने घुसून कुटुंबातील इतर महिलांना मारहाण करून तरुणीला जबरदस्तीने उचलून नेताना राक्षसीवृत्तीचा रविकांत अंबादास राठोड यांच्या कोणत्या मोहिनी मंत्राला बळी पडले होते.

संघटनेतील अनेक महिला पदाधिकाऱ्यांकडून लाखात रकमा घेऊन स्वतःची संपत्ती वाढवून खूप श्रीमंत असल्याचा आव आणणारे रविकांत राठोड हे ब्लॅकमेलिंग, अपहरण करून समाजातील महिलांना संघटनेतील पदाधिकारी,कार्यकर्ते व स्वतःच्या जवळील व्यक्तीचे वापर करण्याची हिम्मत करतातच कशी? सामाजिक कार्य करण्याच्या नावावर यापूर्वी वेळोवेळी संघटनेतील महिला पदाधिकाऱ्यांकडून पैसे लुटल्याचे प्रकार त्यांच्या संघटनेतील काही पदाधिकारी व कार्यकर्ते नाव न सांगण्याच्या अटीवर अटलमतच्या



## बंजारा समाजात रावणासुरी कृत्य करणाऱ्या रविकांत राठोड यांना अटक करण्यास विलंब का?

### रावणासुरी रविकांत राठोड यांना वाचवणारे मंत्री कोण ?

**छत्रपती संभाजीनगर / विशेष प्रतिनिधी :**

बंजारा समाजातील भोळ्या भाबड्या महिला व पुरुषांना बंजारा ब्रिगेड संघटनेमार्फत पाहिजे ती कामे मिळवून देण्याचे आमिष दाखवून चांगल्या घरच्या किंवा कामगार स्त्री-पुरुषांना सुशिक्षित युवकांना आपल्या जाळ्यात अडकवून यापूर्वी अनेक महिलांचे शोषण करणारे स्वयंघोषित राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत अंबादास राठोड यांच्या रावणासुरी कारणामुळे शहरातील काही पोलीस ठाण्यात यापूर्वी गुन्हे दाखल झालेले असतानाही अटक न झाल्याने लोकांना धमकावणे, ब्लॅकमेल करणे, अपहरण करणे, खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची भीती दाखवून काही ना गप्प बसविण्याचे प्रकार रविकांत राठोड (रावणासुर) काही मंत्री महोदयाच्या मदतीने करीत आहे. त्यांच्याविरुद्ध जाणाऱ्या किंवा त्यांच्या रावणासुरी प्रवृत्तींना विरोध करणाऱ्यांना जीवे मारण्याची किंवा खोट्या गुन्ह्यात गुंतवून हलाहल करण्याची घाणेरडी पद्धत अवलंबित असल्याचे प्रकार 'दैनिक अट्टल संकेत'कडे उपलब्ध झालेले आहे.

बंजारा समाजात अनेक सामाजिक संघटना कार्यरत असतानाही रावणासुरी प्रवृत्तीच्या रविकांत राठोड यांच्याविरुद्ध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते गप्प का आहेत ?

बीड येथून छत्रपती संभाजीनगर येथे येऊन बीडची गुंडगिरीची प्रवृत्ती संपूर्ण महाराष्ट्र राज्यात निर्माण करण्याचा प्रयत्न रावणासुरी रविकांत राठोड हे करीत आहेत.

रावणासुरी रविकांत राठोड यांच्या गुंडगिरी, ब्लॅकमेलिंग, महिलांचे अपहरण, महिलांच्या शोषणाचे अनेक पुरावे काही सामाजिक कार्य करणाऱ्यांकडे असताना संबंधित पदाधिकारी किंवा कार्यकर्ते गप्प का?

रावणासुरी रविकांत राठोड यांच्याविरुद्ध भूमिका घेणाऱ्यांना गप्प बसविण्यासाठी बंजारा ब्रिगेड संघटनेतील भोळ्या भाबड्या समाज बांधवांचा वापर केल्याचे प्रकार यापूर्वी घडलेले असतानाही त्यांना यापूर्वी अटक का झालेली नाही ? बंजारा समाजातील अनेकांना लुबाडणाऱ्या रावणासुरी रविकांत राठोड यांना कोण कोणत्या मंत्रींचा वरदहस्त लाभला?

आणि कोणत्या लालचेने मदत करतात याची माननीय मुख्यमंत्री महोदयांनी चौकशी सुरू केल्यास काही मंत्र्यांनाही रावणासुरी रविकांत राठोड यांच्यासोबत तुरुंगाची हवा खावी लागेल यात शंकाच नाही.

रावणासुरी रविकांत राठोड यांच्याविरुद्ध यापूर्वी दाखल असलेल्या गुन्ह्याचे काय झाले? कोणत्या कारणाने सदर गुन्हे दडपले गेले याची राज्याचे माननिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांनी चौकशी करून दोषी आढळणाऱ्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करून बंजारा समाजातील पिळले जाणाऱ्यांना न्याय देतील का?

रावणासुरी रविकांत राठोड यांच्या असुरी कारनाम्याला वेळीच पोलीस प्रशासनाने आळा न घातल्यास महाराष्ट्रातील अनेक महिलांची घरे उध्वस्त होऊन काही महिलांचे प्राण गेल्यास त्याला सर्वस्वी रावणासुरी रविकांत राठोड जबाबदार राहतील.

असे बंजारा समाजातील महिलांनी अटलमतकडे आपल्या प्रतिक्रिया दिलेल्या आहेत. त्यामुळे राज्य शासनाने पोलीस प्रशासन रावणासुरी रविकांत राठोड यांच्याविरुद्ध काय कार्यवाही करतात याकडे बंजारा समाजातील अनेक सामाजिक संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते लक्ष ठेवून आहेत. याशिवाय रावणासुरी रविकांत राठोड यांचे असुरी कारनाम्याचे बरेच पुरावे 'दैनिक अट्टल संकेत'कडे उपलब्ध झालेले असल्याने बंजारा समाजातील समाज बांधवांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्धचे कारनामे उघड करून शासन व पोलीस प्रशासनाला रावणासुरी रविकांत राठोड यांच्याविरुद्ध कार्यवाही करण्यास निश्चितच भाग पाडेल. अशी अपेक्षा बंजारा समाज बांधव करू लागले आहेत. त्यामुळे रावणासुरी रविकांत राठोड यांना पोलीस अटक करतात की मंत्री महोदयाच्या दबावाखाली पाठीशी घालतात हे लवकरच दिसून येईल यात शंकाच नाही.

२१ एप्रिल रोजी प्रसिध्द केलेले वृत्त

प्रतिनिधींना रविकांत अंबादास राठोड यांच्या काळया कारणाम्याबद्दलची माहिती देतानाच काही महिन्यापूर्वी संभाजीनगरातील एका तरुणीच्या कुटुंबातील महिलांना मारहाण करून जबरदस्तीने तरुणीला का उचलून नेले होते? असे प्रति प्रश्न उपस्थित केले?

याबाबतचे मुख्य कारण आजपर्यंत सर्व सामान्य जनतेला समजलेले नाही त्या प्रकरणातही रविकांत राठोड व त्यांच्या सहकार्याविरुद्ध गुन्हे दाखल झाले होते. मात्र त्याबाबत पुढे काय घडले हे मोहिनी मंत्राचा वापर करणाऱ्या रविकांत राठोड यांच्याशिवाय इतरांना माहित नाही, असे त्यांच्या संघटनेतील पदाधिकाऱ्यांनी अटलमतच्या प्रतिनिधीला नाव न सांगण्याच्या अटीवर सांगत होते. रविकांत राठोड हे बंजारा समाजातील राक्षसीवृत्तीचा असून त्याला वेगवेगळ्या मोहिनी विद्याचा अभ्यास आहे की काय?अशी ही चर्चा आमच्या प्रतिनिधी समोरच त्यांच्या संघटनेतील पदाधिकारी व काही कार्यकर्ते करीत होते. रविकांत राठोड मोहिनी विद्या जाणतात की इतरांकडून त्यांना हवे असलेल्या व्यक्तींना मोहित करून पाहिजे त्या व्यक्तींकडून पैसे काढून संबंधित व्यक्तींना बदनाम करण्यात महापटाईत आहेत असेही त्यांच्या मर्जीतील लोकांकडूनच ऐकायला मिळू लागले आहे. रावणासुर,मोहिनी मंत्राचे वापर करणारे महाडोंगी रविकांत राठोड यांनी काही महिन्यापूर्वी तरुणीचे अपहरण करताना अश्लील व्हिडिओ का ? आणि कशासाठी तयार केले होते ?

त्यांच्याविरुद्ध शहरातील एका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला होता? तरी बंजारा समाजातील शिकलेल्या महिला-पुरुष अशा घाणेरड्या प्रवृत्तीच्या व्यक्ती सोबत राहून संघटनेची कामे करतातच कसे? राक्षसीवृत्ती, मोहिनी मंत्राचा वापर स्वतः रविकांत राठोड करतात की इतरांकडून स्वतःच्या समाजातील स्त्री-पुरुषांना वंश करून पाहिजे तसे बेकायदेशीर कामे करायला लावत तर नाही ना? असे प्रश्न बंजारा ब्रिगेड संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्याच मनात निर्माण होत असल्याने रविकांत राठोडच्या भविष्यात त्यांच्या काळ्या कारणाम्याला सोबत राहून सहकार्य करण्याची शक्यता कमी होत असून बंजारा ब्रिगेडचे काही पदाधिकारी लवकरच राजीनामा देऊन त्यांच्याविरुद्ध आवाज उठविणे ही काळाची गरज आहेत. असे आपापसात बोलू लागले आहेत. त्यामुळे काही दिवसात रविकांत राठोड यांच्याविरुद्ध संघटनेतूनच उठाव होऊन त्यांना संघटनेचे अध्यक्ष पदाचा राजीनामा देण्यास भाग पाडायचे की बंजारा ब्रिगेडच्या पदाचे राजीनामे देऊन त्यांच्याविरुद्ध आवाज उठवायचे असेही संघटनेचे काही पदाधिकारी व कार्यकर्ते बोलू लागले आहे. त्यामुळे रावणासुरी रविकांत राठोड यांच्या काळया कारणामेचे परिणाम त्यांना लवकरच भोगावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही ही मात्र निश्चित.

### आसुरीवृत्तीला वाचवणे लज्जास्पद

रविकांत राठोडबद्दल बंजारा समाजातील विविध संघटनांमध्ये कूरबूर सुरू आहे. परंतु विरोध करण्यास मात्र कुणीही पुढे येत नाही. एकाप्रकारे वाटते की, आतून काही समाजातील संघटनांचा छुपा पाठिंबा तर नसावा. जर असे असेल तर खेदाची बाब आहे. जो माणुस आसुरी प्रवृत्तीचा आहे. तसेच त्याचे लक्षण ही ठिक नाही अशा व्यक्तीला छुपा पाठिंबा देणे हे योग्य न्नाही. आसुरीवृत्तीला वाचवणे लज्जास्पदच आहे.

# पाकिस्तानी युट्यूब चॅनल बंदीनंतर सरकारचा 'बीबीसीला' इशारा

**नवी दिल्ली**

पहलगाम हल्ल्यानंतर भारत- पाकिस्तानात तणावपूर्ण वातावरण आहे. हे संबंध आणिखी ताणले जाऊ नयेत म्हणून केंद्र सरकारने १६ पाकिस्तानी युट्यूब चॅनेल ब्लॉक केल्यानंतर आता सरकारने बीबीसीला देखील इशारा दिला आहे. हे प्रकरण अधिक चिघळू नये म्हणून सरकारकडून दक्षता घेण्यात येत आहे.

सरकारने म्हणलं आहे की, बीबीसीसह सर्व विदेशी वाहिन्यांनी हे लक्षात ठेवावे की, त्यांना भारतात प्रसारण करण्याचा त्यांचा परवाना हा त्यांना दिलेला एक विशेषाधिकार आहे. मात्र हा अधिकार मिळाला असला तरी देखील देशातील नियम आणि कायदे पाळणे त्यांना बंधनकारक आहे. मात्र तरी देखील तुम्ही तुमचे पुर्वग्रह देशात पसरवत असाल तर तुम्हाला भारतात प्रसारण करण्याचा तुमचा अधिकार नाकारण्यात येऊ शकतो. केंद्र सरकारकडून ६ पाकिस्तानी युट्यूब चॅनेल ब्लॉक केल्यानंतर सरकारने बीबीसीला देखील इशारा दिला आहे. कारण बीबीसीकडून पहलगाम दुर्घटनेनंतर प्रसिद्ध झालेल्या एका लेखामध्ये बीबीसीने भारतीयांचे व्हिसा पाकिस्ताने निलंबित केले असल्याचे म्हटले आहे. तसेच त्यांनी दहशतवाद्यांना दहशतवादी नाही तर उग्रवादी म्हटलं आहे. मात्र हे उग्रवादी नसून दहशतवादीच होते. जे पाकिस्तानमधून आल्याचं देखील सांगितलं जात आहे. देशभर संतापाची लाट उसळली आहे. त्यात बीबीसीने मात्र वेगळी भूमिका घेतल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार, पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्रीय गृह मंत्रालयाच्या शिफारशींनुसार १६ पाकिस्तानी युट्यूब चॅनेल ब्लॉक केले आहेत. प्रक्षोभक आणि सांप्रदायिकदृष्ट्या संवेदनशील सामग्री पसरवल्याबद्दल एकूण ६.३ कोटी सबस्क्राइबर असलेल्या सोळा पाकिस्तानी यूट्यूब चॅनेलवर भारतात बंदी घालण्यात आली आहे.

# राज्य सेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव बुधवारी (दि.३०) आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्रावर

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**



राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. किरण जाधव हे छत्रपती संभाजीनगर आकाशवाणी केंद्र येथे बुधवारी (३० एप्रिल) आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्रावरील एका कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करणार आहे. आयुक्त डॉ. किरण जाधव यांची सेवा हक्क आयोगाच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त प्रासंगिक या सदराखाली घेतलेली मुलाखत बुधवार दि.३० एप्रिलला सकाळी १० वा. ४५ मि. नी. आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर येथून प्रसारित होणार आहे. जाधव हे महाराष्ट्र राज्य सेवा हक्क अधिनियम २०१५ च्या अनुषंगाने नागरिकांना जागृतीपर मार्गदर्शन करणार आहेत.

# अक्षय तृतीयेचा मुहूर्त; बालविवाह विरोधी पथके सतर्क

## आपल्या जवळपास होणाऱ्या बालविवाहांची माहिती कळविण्याचे प्रशासनाचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

अक्षय तृतीया हा सण बुधवार दि.३० रोजी आहे. या मुहूर्तावर अनेक विवाह होत असतात. त्यात बालविवाह होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी जिल्हा, तालुका व गावस्तरावरील शासकीय यंत्रणांनी सतर्क रहावे,असे आदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी यंत्रणांना दिले आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये बालविवाहाचे प्रमाण लक्षात घेता बालविवाह निर्मूलनासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे. या कृती दलाने बालविवाह निर्मूलन कृती आराखडा तयार केला आहे. त्यानुसार सर्व संबंधित विभागाच्या समन्वयाने जिल्ह्यात बालविवाह रोखण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. दि.१ एप्रिल २०२४ ते आजपर्यंत एकूण ८८ बालविवाह या कृती दलामार्फत थांबविण्यात आले आहेत. चार प्रकरणांमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोग,नवी दिल्ली यांच्या निर्देशान्वये जिल्ह्यामध्ये बालविवाह निर्मूलनासाठी विविध जाणीव जागृतीपर उपक्रम घेऊन जनसामान्यांमध्ये बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ या कायद्याची जाणीवजागृती व्हावी व बाल वयात बाल हक्कांपासून बालके वंचित राहू नयेत यासाठी सर्व संबंधित यंत्रणाच्या समन्वयाने कार्यवाही करण्याचे कामकाज सुरू आहे. दरम्यान या महिन्यात बुधवार दि.३० रोजी असणाऱ्या अक्षय तृतीया या सणाच्या शुभ मुहूर्तावर अनेक बालविवाह होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे सगळे बालविवाह रोखण्याकरिता जिल्ह्यातील तालुका व गावस्तरावरील शासकीय यंत्रणांनी सतर्क रहावे असे आदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

बालविवाह प्रतिबंध अधिनियम२००६ या कायद्यान्वये मुलीचे वय १८ वर्ष व मुलाचे वय २१ वर्षाच्या आत असतांना विवाह केला तर असा विवाह बालविवाह म्हणून गणला जातो. असा विवाह केल्यास आयोजकांना अधिनियमानुसार एक लाख रुपये आर्थिक दंड व दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद किंवा दोन्ही शिक्षेचे प्रावधान आहे.

तसेच ६ जून २०१३ (सुधारित २१.१०.२०२२) च्या शासन आधिसुचनेनुसार ग्रामपंचायतसाठी ग्रामसेवक व १८ ऑगस्ट २०१६ (सुधारित २१.१०.२०२२) च्या अधिसुचनेनुसार नागरी भागाकरिता बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) हे बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून घोषित केले आहेत. जिल्ह्यामध्ये कोठेही बालविवाह होत असतील किंवा होऊ घातले असतील तर नागरिकांनी अशी माहिती चाइल्ड हेल्प लाइन १०९८ तसेच ११२ या मोफत हेल्प लाईन नंबरवर फोन करून द्यावी.

माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येते. आपल्या नजिक होत असलेल्या बालविवाहाची माहिती नजीकचे पोलिस स्टेशन/ग्रामपंचायत कार्यालय/पंचायत समिती/बाल कल्याण समिती/जिल्हा बाल संरक्षण कक्ष तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय येथे देखील तात्काळ संपर्क साधून द्यावी,असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीमती रेश्मा चिमंद्रे यांनी केले आहे.

# संयुक्त महाराष्ट्र समिती चळवळ

**स्वतंत्र** भारतात मराठी भाषकांचे राज्य स्थापन करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र चळवळ हा लढा उभारला गेला. या चळवळीमुळे १ मे इ. स. १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. महाराष्ट्र राज्यात मराठी भाषा बोलणारे मुंबई, कोकण, देश, विदर्भ, मराठवाडा, खानदेश व अजूनही महाराष्ट्राबाहेरच असलेले डांग, बेळगाव, निपाणी, कारवार व बिदर हे भाग अभिप्रेत होते. साहित्यिक, सांस्कृतिक, वैचारिक, राजकीय या सर्व अंगानी ही चळवळ उभी राहिली.

ब्रिटिशांनी आपल्या राज्यकारभारासाठी भारताची विभागणी वेगवेगळ्या प्रांतात केली होती परंतु ती भाषेप्रमाणे नव्हती. इ. स. १९२० रोजी नागपुरात झालेल्या कॉंग्रेस अधिवेशनाच्या वेळी भाषावर प्रांतरचेनेचा मुद्दा महात्मा गांधींनी मान्य केला होता. लोकमान्य टिळक हे देखील भाषावर प्रांतरचनेच्या बाजूने होते. कॉंग्रेसनेच एकेकाळी मान्य केलेला हा मुद्दा स्वातंत्र्यानंतर मात्र पक्षाला, विशेषतः नेहरुंना, संकुचित व राष्ट्रीय एकात्मकतेला धोका वाटू लागला. मुंबईतील भांडवलदारांना जे मुख्यत: अमहाराष्ट्रीय होते. त्यांचा मुंबई महाराष्ट्राला द्यायला कडाडून विरोध होता. इ. स. १९३८ रोजी पटवर्धन संदर्भ हवा व इ. स. १९४० मध्ये ग.त्र्यं. माडखोलकरांनी महाराष्ट्र एकीकरणाचा विषय उपस्थित केला. संदर्भ हवा. माडखोलकरांनी महाराष्ट्र समाजात व्यापार व उद्योग भूमिपुत्रांच्या ताब्यात नसल्याचं व महाराष्ट्राचे कॉंग्रेस पुढारी एकीकरणासाठी प्रयत्न करत नसल्याचे म्हटले. इ. स. १९४६चे साहित्य संमेलन माडखोलकरांच्या अध्यक्षतेखाली झाले. या संमेलनात 'संयुक्त महाराष्ट्र समिती' स्थापन झाले व संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणारे तीन ठराव साहित्यकांनी पाठवले ज्याला राजकीय नेत्यांनी पाठिंबा दिला. इ. स. १९४६ रोजीच भरलेल्या महाराष्ट्र एकीकरण परिषदेत स.का.पाटील यांनी मुंबईला महाराष्ट्राची राजधानी करण्यास विरोध केला. महाराष्ट्रातील डाव्या पक्षांनी सुरुवातीपासूनच मुंबईसह महाराष्ट्र ाला पाठिंबा दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त महाराष्ट्र चळवळीला पाठिंबा होता. या चळवळीला पाठिंबा दर्शविण्याकरिता अनेक ठिकाणी सभा त्यांनी घेतल्या होत्या. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पक्ष संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील एक घटक पक्ष होता.. २८ नोव्हेंबर १९४९ रोजी मुंबई महापालिकेत संयुक्त महाराष्ट्र ाचा पहिला ठराव आचार्य अत्रे व डॉ. आर.डी. भंडारे यांनी 'मुंबईसह महाराष्ट्र'चा ठराव शेडयुल्ड कास्ट फेडरेशनच्या वतीने मांडला. स्वातंत्र्यानंतर भाषिक राज्यांची मागणी होऊ लागली. आंध्र प्रदेश राज्याची मागणी पोट्टी श्रीरामल्लू यांच्या बलिदानानंतर पूर्ण झाली. भाषावार प्रांतरचेनेसाठी नेमलेल्या कमिशनाने महाराष्ट्र राज्याची मागणी डावलली.


**दार कमिशन व जे.व्ही.पी कमिटी –** डिसेंबर इ. स. १९४८ रोजी प्रसिद्ध झालेल्या दार कमिशनच्या अहवालात भाषावर प्रांतरचनेला विरोध दर्शविण्यात आला होता व महाराष्ट्र ीय लोकांवर अपमानास्पद टिप्पणी होती. जे.व्ही.पी कमिटीने महाराष्ट्र व कर्नाटक यांच्या मागणीला पाठिंबा दिला नाही व मुंबई महाराष्ट्रात देण्यास विरोध केला. मुंबई अनेक भाषांच्या व वर्णाच्या लोकांचे, उद्योगधंद्याचे शहर आहे असे अहवालात म्हटले होते. वल्लभभाई पटेलांनी मुंबईचा विकास गुजराती भाषकांनी केल्याचे नमूद केले.

**फाजलअली आयोगाचा निवाडा –** डिसेंबर इ. स. १९५३ रोजी फाजलअली यांच्या अध्यक्षेतेखाली राज्य पुनर्रचना आयोगाची नियुक्ती झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या वतीने एस.एम. जोशी, धनंजय गाडगीळसह इतरांनी आयोगासमोर आपली बाजू मांडली. इ. स. १९५५ रोजी आयोगाचा निवाडा जाहीर झाला. पुनर्रचनेबाबत पायाभूत तत्त्व सगळ्यांना सारखी लागू केलेली नव्हती आणि त्यात मोठी विसंगती होती. हैद्राबादसाठी एक भाषिकाच तत्त्व तर मुंबईसाठी द्वैभाषिकाचं. मुंबई प्रांतात गुजराती भाषिक सौराष्ट्र समाविष्ट करून मराठी भाषिक विदर्भ ,बेळगाव-कारवार बाहेर ठेवले गेले. मुंबईच्या विकासासाठी तिला गुजरातपासून वेगळे ठेवणे योग्य नाही व बेळगाव भाग कर्नाटकाशी 'आर्थिकदृष्ट्या' जोडला असल्याचे तसेच विदर्भ महाराष्ट्रात घातल्यास नागपूर शहराचे महत्त्व कमी होईल असे अहवालात नमूद करण्यात आले. आयोगाला या द्वैभाषिकात मराठी भाषिकांची संख्या गुजराती भाषिकांपेक्षा जास्त होऊ द्यायची नव्हती असेच या विसंगतीचे कारण म्हणावे लागेल.

**त्रिराज्य योजना –** या आयोगाच्या विरोधात महाराष्ट्रभर असंतोषाचा डोंब उसळला. नेहरूनी त्यामुळे सौराष्ट्रासह गुजरात, विदर्भासह महाराष्ट्र व स्वतंत्र मुंबई अशा त्रिराज्य योजना जाहीर केली. त्रिराज्य योजनेत महाराष्ट्रापासून मुंबई तोडण्यामुळे अन्यायाची भावना मराठीजनांत पसरली व संयुक्त महाराष्ट्र चळवळीने पेट घेतला. 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' हे या आंदोलनाचे घोषवाक्य बनलं.महाराष्ट्रीय कॉंग्रेस नेत्यांनी केंद्रीय नेतृत्वासमोर गुडघे टेकले. यामुळे कॉंग्रेसनेते जनतेच्या नजरेतून उतरले. यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे ज्येष्ठ नेत्याने तर नेहरु व संयुक्त महाराष्ट्रात, मला नेहरु महत्त्वाचे वाटतात असे म्हटले. महाराष्ट्रातील कम्युनिस्ट, सोशालीस्ट व प्रजासमाजवादी पक्षातील डावे पुढारी व कॉंग्रेसेतरांनी संयुक्त महाराष्ट्राचा लढा हातात घेतला.

# महाराष्ट्राचा धार्मिक सुधारणांचा, सामाजिक सुधारणांचा इतिहास प्रेरणादायी

**१ मे हा महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिन. याच दिवशी १९६० साली तत्कालिन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. पंडितजींनी यशवंतराव चव्हाण यांच्या हाती महाराष्ट्राचा मंगलकलश दिला आणि नव्या महाराष्ट्र ाच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपविली. तसा महाराष्ट्र ाचा ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक वारसा फार मोठा आहे. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत आणि त्यानंतरही देशाच्या प्रत्येक विधायक उपक्रमात महाराष्ट्राने हिरीरीने सहभाग घेतला आहे. प्राचीन संस्कृतीचा वारसा सांभाळतानाच देशाच्या विकासातही योगदान दिले आहे. महाराष्ट्राचा धार्मिक सुधारणांचा, सामाजिक सुधारणांचा इतिहास प्रेरणादायी आहे. राज्याचे विविधांगी भावविश्वब थक्क करणारे आहे.**



### महाराष्ट्राची निर्मिती कशी झाली?

**देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अनेक प्रांतीय राज्ये मुंबई प्रांतात विलीन करण्यात आली. त्या वेळी मुंबई प्रांतात गुजराती आणि मराठी भाषा बोलणारे लोक राहत होते. त्याच वेळी भाषावार प्रांतरचनेची मागणी जोर धरू लागली. गुजराती भाषिकांना स्वत:चे वेगळे राज्य हवे होते. त्याच वेळी मराठी भाषिक नागरिकही स्वतंत्र राज्याची मागणी करत होते. या मागणीसाठी अनेक आंदोलने झाली. या आंदोलनांचा परिणाम म्हणून १९६० मध्ये मुंबई पुनर्रचना कायद्याअंतर्गत महाराष्ट्र आणि गुजरात अशा दोन राज्यांची निर्मिती करण्यात आली. महाराष्ट्र आणि गुजरात ही राज्ये २५ एप्रिल १९६० रोजी संसदेतफर्के लागू करण्यात आलेल्या बॉम्बे पुनर्गठन अधिनियम १९६० नुसार अस्तित्वात आली. हा कायदा १ मे १९६० रोजी अमलात आला. बॉम्बे पुनर्गठन अधिनियमांतर्गत महाराष्ट्र आणि गुजरात विभागले गेले आणि दोन्ही स्वतंत्र राज्ये झाली.**

महात्मा गांधीजींनी महाराष्ट्र म्हणजे कार्यकर्त्यांचे मोहोळ अशा शब्दांत महाराष्ट्राची प्रशंसा केली. ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या महान कवयित्री महादेवी वर्मांनी महाराष्ट्र हा भारताच्या सिंहद्वाराचा प्रहरी आहे, अशा शब्दात गौरव केला. महाराष्ट्र ही संत-महंत, ऋषि-मुनींची जशी भूमी आहे तशीच शूरवीरांचीही आहे. या भूमीला पराक्रमाची, त्यागाची, देशप्रेमाची परंपरा लाभली आहे. छत्रपती शिवरायांनी सर्वधर्मसमभावाचे पालन केले. हिंदवी स्वराज्य, रयतेचे राज्य स्थापन केले. छत्रपती शिवरायांपासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्र ातील क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके, उमाजी नाईक, गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, राजगुरु, नाना पाटील यासारख्या अनेक देशभक्तांनी इंग्रजांविरुध्द लढा उभारला. अतोनात कष्ट, यातना सहन केल्या. त्यासाठी प्राणांचीही पर्वा केली नाही.

संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वार, संत मुक्ताबाई, संत नामदेव, संत तुकाराम, समर्थ रामदास, संत गोरा कुंभार, संत सावतामाळी, संत नरहरी सोनार, सेना महाराज, संत जनाबाई, संत चोखामेळा, संत कान्होपात्रा, संत एकनाथ, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज अशा संतांच्या मांदियाळीने महाराष्ट्र मनाचे संवर्धन, पोषण करण्याचा प्रयत्न केला. सामाजिक विचार रुजविण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी अण्णासाहेब कर्वे, कर्मवीर शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील यासारख्या समाजसुधारकांनी समाज प्रबोधनासाठी अपार कष्ट घेतले.

देशाच्या स्वातंत्र्याचे स्वप्न पहात असतांनाच द्विभाषिक राज्याचे एक शक्तीशाली राज्य व्हावे यासाठी लोकनेते, बुध्दीवादी, लेखक, पत्रकार यांनी मराठी भाषिक प्रदेशएकत्र आणण्याची कल्पना मांडली. एस.एम.जोशी, आचार्य प्र.के. अत्रे, कॉ.श्रीपाद अमृत डांगे, सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे यांच्यासह अनेक जण नवमहाराष्ट्र ासाठी एक झाले आणि संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार केले.

महाराष्ट्राच्या मातीचे गुणवर्णन अनेक प्रतिभावंतांनी, इतिहासकारांनी करुन ठेवले आहे. महाराष्ट्राचे महात्म्य वर्णन करतांना राम गणेश गडकरी ऊर्फ गोविंदाग्रज यांनी मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा। प्रणाम घ्यावा माझा हा, श्री महाराष्ट्र देशा, राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा । नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा । अशा शैलीदार ओळी वापरल्या आहेत. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनीही बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा हे महाराष्ट्र गीत लिहून महाराष्ट्राच्या व्यक्तिमत्वाचा वेध घेतला आहे. वि.वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांनी 'माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा, हिच्या संगाने जागल्या द-याखो-यातील शिळा अशा शब्दांत स्वाभिमान जागवला आहे. वसंत बापटांनीही भव्य हिम ालय तुमचा अमुचा, केवळ माझा सह्यकडा, गौरीशंकर उभ्या जगाचा, मनांत पूजिन रायगडा म्हणत महाराष्ट्र प्रेम व्यक्त केले आहे. विदर्भ, कुंतल, अश्मक, लाट, अपरान्त अशा विविध नावांनी एकवटलेला मरहट्ट देश म्हणजेच महाराष्ट्र होय. श्री चक्रधर स्वामी तसेच महानुभव कवींनी महाराष्ट्राचे विस्तृत वर्णन केले आहे. समर्थ रामदास स्वामींनी मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा हे प्रेरणादायी सूत्र मांडले. संत ज्ञानेश्वररांनी माझा मऱ्हाचि बोल कवतुके। परी अमृतातेंहि पैजा जिंके। ऐसी अक्षरेरसिकें । मेळवीन अशा शब्दांत मराठीचे माधुर्य मांडले आहे. मा.त्र्यं.पटवर्धन ऊर्फ माधव जूलियन यांनी मराठी असे आमुची मायबोली म्हणत भाषेची थोरवी वर्णिली आहे. गं.रा.मोगरे यांनी माता तशी स्वभाषा, सेवाया होय आपणा उचित। किंबहुना मातेहुनि अधिक हिची योग्यता असे खचित म्हणून भाषेचा गौरव केला आहे. ना.के.बेहेरे यांनी भाषा आमुची छान। मराठी। भाषा आमुची छानभाषा भिन्ना देशदेशच्या सर्वांची परि खाण म्हणून मराठीचे श्रेष्ठत्व सांगितले. संत एकनाथ महाराजांनी संस्कृत वाणी देवे केली। तरी प्राकृत काय चोरापासोनि झाली ? असा परखड प्रश्न विचारला आहे. ख्रिस्तदास स्टीफन यांनी जैसी हरळां (खडा) माजि रत्नकिळा। कि रत्ना माजि हिरानिळा। तैसी भासां माजि चोखाळ। भासा मराठी या शब्दांत मराठी भाषेविषयी अभिमान व्यक्त केला आहे.

ना.गो.नांदापूरकर यांनी माझी मराठी असे मायभाषा हिच्या कीर्तिचे तेज लोकी चढे, गोडी न राहे सुधेमाजि आता, पळाली सुधा स्वर्गलोकांकडे अशा रसदार शब्दांत मराठीचा गोडवा गायिला आहे.

महाराष्ट्राने आतापर्यंत साहित्य, कला, शिक्षण, क्रीडा, संस्कृती, नाट्य, चित्रपट, संगीत, सहकार, कृषी, उद्योग, संगणक, विज्ञान अशा विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. आपल्या पूर्वजांनी दिलेल्या योगदानाची जाणीव ठेवत वैभवशाली इतिहास जपत प्रगतीची नवनवी शिखरे पादाक्रांत करण्याचा निर्धारआपण करावयास हवा.




## १ मे महाराष्ट्र दिन म्हणून का साजरा होतो?

महाराष्ट्र दिन हा महाराष्ट्र राज्याचा निर्मिती दिवस म्हणून साजरा केला जातो. १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. महाराष्ट्र ही तीच भूमी आहे जिच्या कुशीत अनेक महान व्यक्तिमत्त्वे जन्माला आलेली आहेत. ज्ञानेश्वर महाराजांपासून तुकोबांपर्यंत, छत्रपती शिवाजी महाराजांपासून संभाजी महाराजांपर्यंत सगळेच या महाराष्ट्राच्या कुशीत जन्माला आलेले आहेत. मराठी म ाणसासाठी हा दिवस म्हणजे मोठा उत्सवच असतो.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले. मात्र, महाराष्ट्र स्वतंत्र नव्हता! भारत स्वतंत्र झाला तेव्हा देशाचा नकाशा पूर्णपणे वेगळा होता. पुढे हळूहळू देशातील राज्ये भाषा आणि प्रदेशाच्या आधारावर वेगळी झाली. त्यानुसार १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यामुळे हा दिवस महाराष्ट्र दिन म्हणून साजरा केला जातो.

जेव्हा इंग्रजांकडून भारताला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा देशाची प्रादेशिक घटना खूप वेगळी होती. शेकडो राज्ये एकवटली गेली आणि देशाच्या कारभारासाठी राज्य व्यवस्था स्थापन करावी लागली. १९५६ मध्ये, राज्य पुनर्गठन अधिनियम ाने भाषेच्या आधारे भारतातील राज्यांच्या मर्यादा निश्चित केल्या.

आज बरीच नवीन राज्ये आपल्या परिचयाची आहेत, पण त्यांत मराठी, गुजराती, कच्छी आणि कोंकणी अशा भाषिक गटांचा समावेश असलेल्या मुंबई राज्यासारख्या विसंगती निर्माण झाल्या.

या मतभेदांमुळे बॉम्बे स्टेटला दोन राज्यांत विभागण्यासाठी एक चळवळ उभी राहिली, एक म्हणजे जेथे लोक प्रामुख्याने गुजराती आणि कच्छी बोलतात आणि दुसरे जेथे लोक प्रामुख्याने मराठी आणि कोंकणी बोलतात.

# सांख्यिकी विभागाच्या ७५ वर्षपूर्तीनिमित्त मोटारसायकल रॅली



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

भारत सरकारच्या राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयास ७५ वर्षे पूर्ण झाल्या बद्दल आज मोटार सायकल रॅलीद्वारे जनजागृती करण्यात आली. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या वतीने या रॅलीचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयापासून या मोटार सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी हिरवी झेंडी दाखवून रॅलीस रवाना केले. वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी विपीन प्रकाश, अजयकुमार यादव, ज्ञान बहादूर पटेल, मनिष कुमार, आदित्य रंजन, नकुल कुमाल तसेच विभागातील अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

या रॅलीद्वारे राष्ट्रीय सांख्यिकी विभागाच्या वतीने राबविण्यात येणारे विविध सर्व्हेक्षण, विविध नमुने सर्व्हेक्षण याबाबत जनजागृती करण्यात आली.

# प्रा. इम्रान शेख यांना पीएचडी पदवी प्रदान

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर येथील शिवछत्रपती महाविद्यालयातील प्रा. शेख इम्रान इस्माईल यांना डॉ. बाबासाहेब अंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडून नुकतीच वाणिज्य विषयातून पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.त्यांनी 'रिलीजिओसिटी अमंग मुस्लिम कंसुमर्स एंड इट्स इम्पैक्ट ऑन कंसुमर बाइंग बेहवीयर टुवर्ड्स फूड प्रोडक्ट्स इन महाराष्ट्र' या विषयावर संशोधन कार्य केले आहे. मार्गदर्शक म्हणून डॉ. माणिक वाघमरे आसारामजी भांड्वालदार कॉलेज, देवगांव रंगारी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच डॉ नवनाथ आघाव, संशोधन केन्द्रप्रमुख, डॉ सय्यद अज़हरुद्दीन, डॉ. गणेश काथार, डॉ. विलास दापके, डॉ. अविनाश धोत्रे यांचे विशेष सहकार्य लाभले.



तसेच शिवछत्रपती महाविद्यालय विकास समिति सदस्य, प्राचार्य आणि उपप्राचार्य व सर्व सहकारी यानी समाधान व्यक्त केले. व तसेच वडील इस्म इल बागवान, ज्येष्ठ बंधु सादिक बागवान(उपसरपंच हरतखेडा) व मामा सत्तार बागवान (माजी सरपंच आव्हाना) व सर्व बागवान कुटुंबाने कौतुक केले. प्राध्यापक इम्रान शेख हे मुळ हरतखेडा तालुका अंबड, जिल्हा जालना येथील रहिवासी आहेत, पीएचडी प्रदान करणारे ते गावातील प्रथम व्यक्ति आहेत करिता त्यांचे कौतुक हे ग्रामस्थांसह मि त्रपरिवारातून होत आहे.

# मानव कल्याणासाठी बसवेश्वर महाराजांच्या कार्याचे अनुकरण आवश्यक

**बसवेश्वर** महाराजांना कोणत्याही प्रकारचा लोभ नसल्यामुळे न्याय प्रीय राजा होते.बसवेश्वर महाराज हे बसव,बसवण्णा इत्यादी नावाने ओळखले जात असले तरीही थोर समाजसुधारक म्हणून त्यांची मोठी ख्याती होती.त्यामुळे त्यांचे कार्य आजही तेवढेच महत्त्वाचे व गरजेचे आहे.इ.स.११०५ ते ११६५या कालखंडात होऊन गेलेले कर्नाटकातील संत व सम ाजसुधारक होते.त्यांनी नेहमी निर्गुण व निराकार एकेश्वरवाद श्रध्देचा पुरस्कार केला. कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर-बागेवाडी या गावात ११०५ साली वीरशैव कुटुंबात बसवेश्वर महाराजांचा जन्म झाला. मुख्यत्वेकरून त्यांचा जन्म अक्षतृतीयेला झाला.अक्षतृतीया हा दिवस साडेतीन मुहूर्तापैकी एक व महत्वाचा दिवस मानल्या जातो. त्यामुळे या दिवसाला शुभ मानण्यात येते. बसवेश्वर म हाराज कर्मठ विधीचा विरोध करायचे अशा परिस्थितीत मुंजीचा विरोध करून मला आधीच लिंगदीक्षा मिळाली आहे असे सांगत वयाच्या ८ व्या वर्षी घर सोडून ते कूडलसंगम येथे निघून गेले.कृष्णा व म लप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडलसंगम येथे मोठे अध्ययन केंद्र होते.तेथे बसवेश्वरांनी १२ वर्षे वास्तव्य केले.कुडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा,धर्म, तत्वज्ञान इत्यादींचा प्रगल्भ अभ्यास केला.त्यांचा विवाह मामाच्या मुलीशी झाला व त्यानंतर सोलापूरातील मंगळवेढा येथे आले. बसवेश्वरांनी मंगळवेढा येथे लोकशाही संसद स्थापन केली.या संसद मंडपात सर्व धर्मातील लोक एकत्र येऊन सामाजिक अडचणींवर कशी मात करायची यावर चर्चा करून व योग्य निर्णय घेवून पुढील कार्य होत असे. बसवेश्वर यांचे एकच उद्दिष्ट होते ते म्हणजे समाजातील वाईट चालीरितीचा विरोध करून समाजाच्या हिताच्या गोष्टींची अंमलबजावणी करण्याकडे जास्त महत्त्व देत असे.

१२ व्या शतकातील आदर्श,समतेचे, जनकल्याणकारी प्रणेते म्हणून बसवेश्वर महाराज ओळखले जायचे.त्यामुळेच १२ व्या शतकापासून खऱ्या अर्थाने लोकशाहीला सुरूवात झाल्याचे सांगण्यात येते. कारण लोकशाहीमध्ये समता,मुल्य, न्याय, बंधूंता,एकात्मता, संपूर्ण स्वतंत्र, अधिकार,नियम, नियंत्रण, शिस्त,सूशासन व योग्य प्रशासन यामुळे समाज व देश घडण्यास मोठी मदत मिळते. बसवेश्वर म हाराजांच्या संसदेत जातीभेला बीलकुलच थारा नव्हता.त्यामुळे त्यांना समाजाला एकत्र बांधण्यास मोठी मदत मिळाली. कारण कोणत्याही प्रकारचा भेदभाव ते कदापि सहन करत नसे.आपल्याला २१ व्या शतकात जे कायदे दिसतात त्यात बसवेश्वर महाराजांचा सिंहांचा वाटा आहे.बसवेश्वर महाराजांना साक्षात नंदीचा अवतार मानल्या जाते.आपण ज्याला शंकरजीच वाहन म्हणतो.भगवान शंभर या पृथ्वीचा,मानव, पशुपक्षी व जीवजंतू यांचा पालनहार आहे.



त्यांच्या सोबत नंदी म्हणजे साक्षात परमेश्वर बसवेश्वर महाराज म्हणजे ही दैवी लीलाच म्हणावी लागेल. कृष्णा आणि मलापहारी नद्यांच्या संगमावर असलेल्या गुरूकुलात ज्ञानी गुरूजनांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शिक्षण घेतले. विविध ग्रंथांचा, ज्ञानाच्या सर्व शाखांचा अभ्यास केला. त्याम ुळेच त्यांनी संस्कृत ग्रंथातील धर्मतत्वे कन्नडमधुन लिहिली.बसवेश्वर महाराजांनी नेहमी आध्यात्मिक जीवन व समाज घडवीण्याच्या चालीरीतीचे मार्गदर्शन नेहमीच करीत असे. कर्नाटक व दक्षिण महाराष्ट्रात आपल्याला लोकांच्या जिभेवर आजही बसवेश्वरांची वचने आरूढ झाल्याचे दिसून येते.सत्ता वैभव आणि कीर्ती याला यत्किंचितही वाव न देता आध्यात्मिक व नितिमुल्याला प्रथम प्राधान्य देवून समाज हितासाठी अहोरात्र प्रयत्न केले. बसवेश्वरांच्या काळात सम ाजव्यवस्थेत स्त्रीयांना शुद्र, बहिष्कृत सम जले जायचे. त्यांना स्त्रीयांवर होत असलेला अत्याचार सहन झाला नाही. याकरीता त्यांनी या विरूद्ध मोठा लढा उभारून मोठे भरीव कार्य केल्याचे दिसून येते.

तत्कालीन समाजव्यवस्थेला व राजसत्तेला हादरवून टाकणारा आंतरजातीय विवाह महात्मा बसवेश्वरांच्या पुढाकाराने १२ व्या शतकात घडला.त्यामुळे बसवेश्वर महाराजांचे प्रत्येक कार्य व त्यांची जीवनशैली आज समाजाला प्रेरणादायी ठरू शकते व ठरत आहे.आज देशातील राजकीय पुढाऱ्यांनी बसवेश्वर महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन समाज हितांचे व देश हिताचे कार्य करण्याची नितांत गरज आहे. राजकीय पुढाऱ्यांनी बसवेश्वर महाराजांचे अनुकरण करून भ्रष्टाचार व वाजवीपेक्षा जास्त असलेली चल-अचल संपत्तीचा त्याग करून सरकारी तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणली पाहिजे व महात्मा बसवेश्वरांचे आदर्श सामोरं ठेऊन समाजकार्य केले तरच खऱ्या अर्थाने राजकीय पुढाऱ्यांमार्फत बसवेश्वर म हाराजांची जयंती साजरी झाली असे गृहीत धरले जाईल.कारण राजकीय पुढाऱ्यांजवळ समाजसेवक, लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी अशी मोठी जबाबदारीची आणि नामांकित पदे आहेत.त्याचा उपयोग समाज घडविण्यासाठी व्हायलाच हवा.बसवेश्वर महाराजांजवळ कोणतेही पद नसताना सम ाज हितासाठी अहोरात्र कार्य केले.कारण ते त्यागी, निष्ठावान,महान समाजसेवक व समाजसुधारक होते.त्यांचे अनुकरण करून आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी कार्य करण्याची नितांत गरज आहे.वैशाख शुद्ध तृतीया म्हणजे अक्षय्य तृतीया यांच दिवशी महात्मा बसवेश्वरांचा जन्म झाला.त्याचप्रम ाणे याच दिवशी पराक्रमी भगवान परशुराम यांचाही जन्म झाला हा एक संयोगच म्हणावा लागेल. अक्षय्य तृतीया या शुभ मुहूर्ताचे औचित्य साधून, महात्मा बसवेश्वर आणि भगवान परशुराम यांच्या जयंतीचे शुभ संकेत लक्षात घेता या भारत भुमित आजच्या दिवशी प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावुन आगळावेगळा ऐतिहासिक उपक्रम राबवुन पृथ्वीला वाचविण्याचा संकल्प संपूर्ण मानवजातीने करायला हवा.कारण म ानवजातीच्या कल्याणासाठी आज तीन दैवी शक्ती एकत्र विराजमान आहेत.त्यामुळे तीन दैवी शक्तीचा (अक्षय्य तृतीया, बसवेश्वर जयंती,परशुराम जयंती) संयोग दिवस ३० एप्रिलला उजाडला आहे.यामुळे प्रत्येकांनी वृक्षारोपण करून मानवजातीचा धर्म पाळला पाहिजे.यामुळे ऑक्सिजनची मात्रा वाढेल व मानवजातीचे कल्याण होईल, गुरांना मोठ्या प्रमाणात चारा मिळेल, पशुपक्ष्यांना शुद्ध हवा व सावली मिळेल.

यातच आपल्याला अक्षय्य तृतीया,म हात्मा बसवेश्वर,भगवान परशुराम यांचे दर्शन घडुन येईल यात दुमत नाही. कारण संपूर्ण वृक्षांच्या जळा-मूळात, फळात, फुलात, पानात व झाडांच्या कणाकणात आपल्याला थोरमहात्म्यांचा, साधुसंतांचा व बसवेश्वर महाराजासह संपूर्ण देवी-देवतांचा वास अवश्य दिसून येईल.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

# बाजार समितीच्या बंदविरोधात बळीराजा संघटनेचे निवेदन; शेतकऱ्यांच्या नुकसानीबाबत कारवाईची मागणी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर कृषी उत्पन्न बाजार समितीतील व्यापाऱ्यांनी दोन दिवसांपासून बेकायदेशीर बंद पुकारल्यामुळे शेतकऱ्यांच्या भाजीपाला व अन्य कृषी म ालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीची भरपाई व्यापाऱ्यांनी द्यावी, अशी मागणी बळीराजा संघटनेने बाजार समितीच्या सचिवांकडे निवेदनाद्वारे केली.



संघटनेचे संस्थापक अध्यक्ष निवृत्त डक पाटील आणि प्रदेशाध्यक्ष शिवाजी साळुंके यांनी यावेळी सांगितले की, बाजार समितीच्या संचालक मंडळ व व्यापारी वर्गातील वादाचा फटका शेतकऱ्यांना बसू नये. शेतकऱ्यांचे माल सडून जात असताना, अशा प्रकारचा बंद अक्षम्य आहे. यापुढे शेतकऱ्यांचे नुकसान खपवून घेतले जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. निवेदनात म्हटले आहे की, अशा बेकायदेशीर बंदसदृष्य कृती करणाऱ्या व्यापाऱ्यांवर तत्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तसेच, भविष्यात कोणताही बंद पुकारण्याआधी शेतकरी संघर्ष समिती आणि अखिल भारतीय बळीराजा संघटनेला विश्वासात घ्यावे, अन्यथा मोठ्या प्रमाणावर शेतकरी रस्त्यावर उतरतील, असा इशाराही देण्यात आला. शेतकऱ्यांच्या मुलांसाठी प्रस्तावित वस्तीगृह प्रकल्पालाही काही व्यापारी विरोध करत असल्याचे समजते. यावर बोलताना निवृत्त पाटील म्हणाले की, 'व्यापारीही शेतकरीच आहेत, ते शेतकऱ्यांच्या प्रकल्पांना विरोध करणार असतील तर त्यांना जसेच्या तसे उत्तर दिले जाईल.

या निवेदनावर मराठवाडा कार्याध्यक्ष प्रभाकर भुसारे पाटील, जिल्हाध्यक्ष आबासाहेब भोसले, जिल्हा सचिव ज्ञानेश्वर काकडे, सोशल मीडिया प्रमुख बापू लोखंडे, तुकाराम राऊत आणि महिला पदाधिकारी शोभा वाकले आशा भादवे यांचीही सही होती.

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम दशकपूर्ती पारदर्शक व सौजन्यशील सेवा हा लोकांचा अधिकार- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

शासकीय अधिकारी- कर्मचाऱ्यांनी आपल्या विभागामार्फत पारदर्शकतेने व सौजन्यशील सेवा लोकांना द्यावी. अशी सेवा मिळणे हा लोकांचा अधिकार असून त्या उद्देशानेच महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ हा कायदा तयार करण्यात आला आहे,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ या कायद्याच्या दशकपुर्तीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. निवासी उपजिल्हादिकारी विनोद खिरोळकर, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, डॉ. सुचिता शिंदे, एकनाथ बंगाळे, उमाकांत पारधी तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, लोकांची सेवा करण्यात एक आनंद आहे. लोकांना सेवा दिल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान पाहून आपल्यालाही आनंद होतो. ही अनुभूती महत्त्वाची असते. शासनाने लोकांना प्रत्येक सेवा ही विहित कालमर्यादेत दिली जावी. दिली जाणारी सेवा ही पारदर्शक असावी तसेच ती देतांना सौजन्यशीलता असावी हे अपेक्षित आहे. शासकीय सेवा करतांना आपण ती लोकांच्या सेवेसाठी करीत आहोत ह्याचे भान प्रत्येक शासकीय कर्मचारी अधिकाऱ्यांनी असू द्यावे,असेही त्यांनी सांगितले. निवासी उपजिल्हाधिकारी खिरोळकर यांनी उपस्थितांना सेवा हक्क दिनाची शपथ दिली.

# जिल्हाधिकाऱ्यांची संकल्पना बालहक्क संरक्षणाची पंचसूत्री; १ मे पासून जिल्ह्यात अंमलबजावणी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

बाल कामगार, बाल भिक्षेकरी, शाळा बाह्य मुले, बालकांचे आरोग्य आणि बाल विवाह या सर्व समस्यांचे समूळ निराकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी 'पंचसुत्री; बालहक्क संरक्षणाची' हा कालबद्ध कार्यक्रम तयार केला असून सर्व संबंधित विभागांमार्फत महाराष्ट्र दिन अर्थात दि.१ मे पासून या कार्यक्रमाची जिल्ह्यात अंमलबजावणी सुरु होत आहे.

बालकामगार, बाल भिक्षेकरी, शाळा बाह्य मुले, बालकांचे आरोग्य आणि बालविवाह या सारख्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी कामगार विभाग, महिला बालकल्याण विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, पोलीस अशा विभागांनी संयुक्तपणे हा उपक्रम राबवावयाचा आहे.

दि.१ मे पासून हे अभियन सुरु होईल. त्यात बाल कामगार आढळण्याची शक्यता असलेली ठिकाणे शोधून धाडसत्र राबवून बालकामगारांची सुटक करुन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे. या उपक्रमात कामगार विभाग, जिल्हा कृती दल सदस्य, विशेष बाल पोलीस पथक, बाल कल्याण पोलीस अधिकारी, चाईल्ड हेल्पलाईनचे अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे कर्मचारी ही कारवाई करतील. ३१ मे पर्यंत हे अभियान पूर्ण होईल. त्याच धर्तीवर बाल भिक्षेकरी हुडकून त्यांनाही भिक्षा मागण्यापासून परावृत्त करुन शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात येईल. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी हे अभियान राबवतील.त्याच प्रमाणे दि.१ ते १५ मे या कालावधीत जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे (माध्यमिक व प्राथमिक) शिक्षणाधिकारी तसेच शिक्षणाधिकारी मनपा हे शाळा बाह्य मुलांचे शहरी व ग्रामिण भागात सर्व्हेक्षण राबवतील. त्यानंतर त्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणतील.बालकांच्या आरोग्या संदर्भात १ ते ३१ मे दरम्यान विशेष मोहिम राबविण्यात येईल. त्यात सध्या उष्णतेशी लढा, लसीकरण, जीवनसत्व विषयक डोस, किशोरवयीन बालकांचे स्वास्थ्य, मान्सिक आरोग्य, पोषण आहार या विषयी घरोघरी जाऊन जाणीव जागृती करण्यात येईल. या उपक्रमात प्राथमिक आरोग्य केंद्र, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका सहभागी होतील. १ मे ते ३० जून या कालावधीत बालकांच्या हक्कांबाबत जाणीव जागृतीचे अभियान राबविण्यात येईल. त्यात बालकांचे हक्क, बालकांविषयीचे कायदे, शाळा सुरक्षा नियमावली, बाल संरक्षण इ. बाबत माहिती देण्यात येईल. या उपक्रमात प्राथमिक, माध्यमिक शिक्षण विभाग सहभागी होईल. शहरी भागात मनपाचे शिक्षणाधिकारी हा उपक्रम राबवतील. या अभियानाच्या अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी संबंधित उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, पोलीस निरीक्षक हे या समितीचे सदस्य असतील. बालविकास प्रकल्प अधिकारी हे या समितीचे सदस्य सचिव असतील. या समितीने वेळोवेळी या उपक्रमाचा आपापल्या तालुक्यात आढावा घेऊन संनियंत्रण करावे व अभियान राबवावे, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

# पैठण येथील श्रीमहानुभाव दत्त मंदिर विकास आराखड्यास उच्चाधिकार समितीची मान्यता




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

पैठण येथील ऐतिहासिक व महानुभाव पंथाचे महत्त्वाचे तीर्थस्थळ असलेल्या श्रीमहानुभाव दत्त मंदिराच्या विकास आराखड्याचे आज मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकारी समिती समोर सादरीकरण झाले. या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी तयार करण्यात आलेल्या २५ कोटी रुपयांच्या आराखड्यात काही बदल सुचवत या आराखड्यास मान्यता देण्यात आली व सुधारीत आराखडा सादर करण्याचे आदेश देण्यात आले.

दुरदृष्य प्रणालीद्वारे हे सादरीकरण झाले. राज्याच्या मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक यांच्यासमोर हे सादरीकरण करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, पैठण नगरपालिकेच्या मुख्याधिकारी पल्लवी अंभोरे. मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष शेवलीकर आदी जिल्हा मुख्यालयातून उपस्थित होते.

श्रीमहानुभाव दत्त मंदिर ट्रस्ट हे महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्रीचक्रधर स्वामी यांच्याशी संबंधित आहे. ११८९ च्या सुमारास चक्रधर स्वामी या भागात वास्तव्यास होते. श्री स्वामी त्र्यंबकेश्वर ते राहेर या समग्र गोदावरी काठी विहार करीत. येथेच त्यांनी आपल्या अनुयायांना उपदेश केले. त्यामुळे हे स्थळ महानुभाव पंथियांसाठी महत्त्वाचे आहे. या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी २५ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला.

त्यात भक्तनिवास, सभागृह, ग्रंथालय, स्वच्छता गृह, वाहनतळ व परिसर सुशोभिकरण आदी कामे करण्यात येणार आहेत.

या आराखड्यात मुख्यसचिव श्रीमती सौनिक यांनी व समिती सदस्यांनी काही फेरबदल सुचविले. पर्यावरण पूरक रचना व सौर उर्जेचा अधिकाधिक वापर, तसेच वृक्ष लागवड, पदपथ आदी दुरुस्त्या सुचविल्या. त्यानुसार आराखडा सुधारीत करुन पुन्हा सादर केला जाईल. या संदर्भात दि.१० मे नंतर पुढील बैठकीत अंतिम निर्णय होईल,असे सांगण्यात आले.

(ओव्हर टेक विशेष)

# बरी नव्हे राजा: ओव्हर टेकची मजा!

**कारण 'हम भी किसीसे कम नही!' हाच त्याचा स्वाभिमानी हेका असतो, तोरा असतो. परंतु त्याला हे कळत नाही, कि जाऊ दे बिचाऱ्याला! तो अंत्यत तातडीच्या कामात असेल. त्या ओव्हर टेकरची गाडी अधिक बलशाही व नवीन, कोरी करकरीत असेल. जाऊया आपण आपल्या नित्य चालीने. ओव्हर टेकरला मात्र ही सवय नित्याचीच होऊन जडलेली असते. कुठल्याच कामात तो मागे राहू इच्छित नाही. यातून त्यास खुप मोठा आनंद मिळत असावा, मात्र तो क्षणिक आणि आसुरी आनंद असतो. तो शाश्वत आनंद, ब्रह्मानंद मुळीच नसतो, हे मात्र नक्की! असेही त्याला वाटते, की आपण फार मोठे पराक्रमी वीर आहोत, म्हणून 'सदैव सैनिका पुढेच जायचे!' या तोऱ्यात तो मिरवत फिरतो. ही मार्गदर्शक जाणिव जागृती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दातून जरूर वाचा... संपादक.**

आज प्रत्येकाच्या मुखातून हे शब्द बाहेर पडताना दिसतात, की सद्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. म्हणूनच की काय? आजचा युवकवर्ग पुढच्यास ओलांडून त्याच्या कितीतरी पुढे निघून जाण्याच्या नादात- ओव्हर टेक करण्याच्या प्रयत्नात सदासर्वकाळ दिसून येतो. यातच तो आनंद मानतो, हेच आपले ध्येय समजतो. मग तो जीवनमार्ग असू द्या किंवा वदर्ळीचा राष्ट्रीयमार्ग तथा आंतरराष्ट्रीय महामार्ग असू द्या. आपलाच एक बांधव आहे, आपल्यासारखाच एक मानव आहे, अशी कदाचित त्याला कल्पना किंवा बुद्धीच उमगत नसावी. असे ते ओव्हर टेकचे भयान नाट्य बघून वाटते. बरं, एकाने ओव्हर टेक केले, म्हणून दुसरा तरी शांत व आपल्या चालीने- वेगाने मार्गक्रमण असतो का? नाही. त्याला पण चेव येतो, त्याची तीव्रपणे चेतना जागृत होते. मग तो चिडून त्वेषाने इरेस पेटतो आणि आपणही त्याला मागे पाडावे, म्हणून तो गाडी अतिवेगान दामटू लागतो. कारण 'हम भी किसीसे कम नही!' हाच त्याचा स्वाभिमानी हेका असतो, तोरा असतो. परंतु त्याला हे कळत नाही, कि जाऊ दे बिचाऱ्याला! तो अंत्यत तातडीच्या कामात असेल. त्या ओव्हर टेकरची गाडी अधिक बलशाही व नवीन, कोरी करकरीत असेल. जाऊया आपण आपल्या नित्य चालीने. ओव्हर टेकरला मात्र ही सवय नित्याचीच होऊन जडलेली असते. कुठल्याच कामात तो मागे राहू इच्छित नाही. यातून त्यास खुप मोठा आनंद मिळत असावा, मात्र तो क्षणिक आणि आसुरी आनंद असतो. तो शाश्वत आनंद, ब्रह्मानंद मुळीच नसतो, हे मात्र नक्की! असेही त्याला वाटते, की आपण फार मोठे पराक्रमी वीर आहोत, म्हणून 'सदैव सैनिका पुढेच जायचे!' या तोऱ्यात तो मिरवत फिरतो. किंवा नुसतीच त्याला मिरवायचे असते की आपण किती कार्यतत्पर आहेत. आपली कामाची उरक लोकांच्या डोळ्यांत त्वरेने भरण्याची घाई त्याला झालेली असते. जशी आपल्याकडे झाडीबोलीतील एक म्हण प्रसिद्ध आहे तशी–

'येलपाडीचे (मिजासखोर स्त्रीचे) आले डोळें
खाटले ठेवून खाल्या लोळें'

ज्ञानवंतांनी भुकेल्या, तहानलेल्या, अधाशी, हपापलेल्या व्यक्तीस पुढ्यात घेऊन त्याची इच्छा पूर्ण केली पाहिजे. त्याच्यासारखेच ज्ञानवंतही करू लागले तर त्यांच्यातील फरकच कळणार नाही. म्हणून ज्ञानवंतांनी संयम, सबुरी व धीरानेच अशा प्रसंगाना सामोरे जाणे इष्ट ठरते. एकदा एका बाइकस्वाराने ओव्हर टेक केला. तेव्हा मागे पडलेला बाइकस्वार त्वेषाने पेटून उठला व बाइक वेगात दामटली. अतिवेगामुळे वळणावर ती घसरली आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या दगडावर जोरात आपटली. तिचा चेंदामेंदा झाला, तर बाइकस्वाराने मात्र या जगाचा कायमचा निरोप घेतला. दुसरी एक घटना अशी, की चार चाकी कारला एका बाइकस्वार युवकाने ओव्हर टेक करून मागे टाकले आणि तो शहरातील मुख्य चौकात येऊन काहीतरी खरेदी करू लागला. तेवढ्यात ती कार येऊन पोहोचली. कारचालक युवती त्याला आडवी झाली. 'मला ओव्हर टेक करण्याची तुझी हिंमतच कशी झाली?' म्हणत आधी त्याच्या गालांगालावर मोजले आणि मग त्याला चांगलेच बदडून काढले. असा आपल्याला ओव्हर टेक केल्याचा वचपा, बदला घेतला. किती मोठ्ठा आनंद, परमानंद झाला असेल तिला! नाही काहो? तरीही बिच्चारा युवक शांतच! अशा या भानगडी विनाकारण जीवावर बेतत असतात. तरीही ओव्हर टेकर्सना यात काहीच कशी लाज-शरम वाटत नाही? ईश्वरप्राप्ती करून ब्रह्मानंद प्राप्तीसाठी अशी तातडी, असे साधकांना ओव्हर टेक करणारे महाभाग मात्र क्वचितच दृष्टीस पडतात. कारण या आध्यात्मिक, भक्तिमार्गावर चालणारा लंगडालुळा होत नाही तर त्याचा थेट पुनर्जन्मच होतो, एक खरा भला माणूस म्हणूनच!



– संकलन व शब्दांकन –
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

समजा, आपली एखादी मूल्यवान वस्तू घरातच कुठेतरी हरवली. ती जोपर्यंत आपल्या दृष्टीस पडत नाही तोपर्यंत मनास चैन पडेल तर शप्पथ! ती शोधण्यासाठी आपण एका पाठोपाठ एक साधन वापरतो. कधी काठीने, कधी झाडूने ओढून, ढकलून वा चाचपडून बघतो. तर कधी विजेरीचा प्रकाशझोत टाकून डोळे फाडफाडून पाहतो. ती वस्तू सांपडत नाही, तोवर शोध घेणे आपण थांबवित नाही. सहज एखादे सद्गृहस्थ यावे आणि वस्तू उचलून तुम्ही शोधत आहात ते हेच का? असे उच्चारताच आपली उत्सुकता शिगेला पोहोचते. झटकन ती वस्तू हातात घेऊन तिला निरखून बघतो आणि मोठ्या आनंदाने खड्या आवाज म्हणतो, 'अहो, ती हीच माझी अमोलक वस्तू! मी हीलाच शोधत होतो.' असे म्हणून आपण पूर्वीप्रमाणे ती वस्तू शोधत राहाल का? नाही. आधी त्या दात्या व्यक्तीस अनेक नमस्कार घालतो, धन्यवाद देऊन त्याचे स्तुतीपाठ गातो. आजीवन ऋणी व उपकृत राहण्याचे बोलून दाखवितो व वचनबद्ध होतो. आपण परत त्याच वस्तूचा शोध सुरूच ठेवला, तर लोक आपल्याला नक्कीच मूर्ख ठरवतील. मात्र त्या वस्तूची स्वच्छता, सुरक्षा, सुशोभन, कलाकुसर, काळजी आदी वेळोवेळी चालवित असतो. अगदी असेच ब्रह्मानंद व ईश्वरप्राप्तीस केल्या जाणाऱ्या भक्ती वा पुजापाठाचे आहे. विचारा, कसे? तर आपण पुजापाठ कशासाठी करतो? त्यामागील उद्देश साफ-स्पष्ट असावा लागतो. ईश्वरप्राप्ती करून ब्रह्मानंद मिळवावे, असा उद्देश असेल तर वरील दृष्टांत तंतोतंत लागू पडतो. त्यासाठीच आपण पुजापाठ, जप, तप, योगयाग करत असतो. परंतु अनेक शोध शोधांती एखादा ब्रह्मवेत्ता सद्गुरू मिळाला आणि त्याने ब्रह्मदर्शन घडवून दिले. तर मग परत तसलेच पुजापाठ करत बसणे योग्य राहील का? नाही ना! म्हणून मग केवळ ईश्वरास आमरण प्रसन्न ठेवण्यासाठी सद्गुरूच्या आदेश व वचनांचे पालन करत त्यालाच आपण सदैव हसतमुख ठेवण्याचा प्रयत्न करतो. हे सर्वश्रूत आहे, हीच खऱ्या ब्रह्मानंदप्राप्त साधकांची परंपरा आहे. आपण जिथून सुरूवात केली होती, तिथे थांबून सांगावेसे वाटते, की ओव्हर टेक करणारास पुढे जाऊ द्या, पण मागे पडणाराने अजिबात चालाखी करू नये. पुढे जाणारास पुढ्यात घेऊन त्याच्या यशस्वीतेबद्दल सहकार्य द्यावे, यामुळे काय होईल? तर वाईट प्रसंग वा अप्रिय घटना अजिबात उद्भवणार नाही. वादंग वा हिंसाचाराला आपणच ब्रेक लावू शकाल, एवढे मात्र निश्चिंत! यात तुम्हाला जो आनंद मिळेल; तो खरोखरच ब्रह्मानंद असेल..!

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com.